# <u>१६ . शिवामूठ</u>

माझ्या घराच्या समोर सोसायटीचे देऊळ आहे . शंकर , गणपती व दत्त असे मुख्य देव आहेत . बरीच वर्षे श्रावण सोमवारी नवविवाहीत मुली शिवामुठ वहायला शंकराच्या देवळात सकाळपासून गर्दी करतात . दर सोमवारी वेगळी शिवामूठ असते . कधी तांदूळ, उडीद, जव वगैरे . दुस-या दिवशी पुजा-याला एक नवीन कामगिरी असते . अर्थातच साफसफाईची .

मी नेहमी विचार करीत असे की ह्या शिवामूठ प्रकरणामागे काहीतरी पुराणातील गोष्ट असेल .
माझी पत्नी सुद्धा माझ्यासारखीच . कर्मावर विश्वास . व्रतवैकल्य नाहीतच त्यामुळे तीला काही माहित नव्हते . हाच प्रश्न मी माझ्या आईला विचारला होता पण फारसा प्रकाश ती पण टाकू शकली नव्हती .

श्रावण महिना सुरू झाला आणि पेपरात शिवामुठीची गोष्ट पहिल्याच सोमवारी दिली होती . पुढे काही भाष्य करण्याआधी प्रथम तुम्हाला ती गोष्टच सांगतो .

एक राजाची एक नावडती सुन होती . ती देवाची भक्ती करी . तीला कोणीतरी सांगितले होते की शिवामूठ वाहण्यामुळे शंकर खूष होतील व ती नावडतीची आवडती होईल . मुलेबाळे व्यवस्थित होतील . पैसा अडका संपत्ति मिळेल ,भरभराट होईल वगैरे . . . आणि खरोखरच ती आवडती सून होते व इतर सर्व सुजलाम सुफलाम . असो .

मला गोष्ट वाचून मजाच वाटली . वरील सर्व गोष्टी कदाचित पुजा न करताच झाल्याही असत्या . पण त्या गोष्टी होण्याचे क्रेडिट मात्र शिवामुठीला होते .

आपल्याला बरीच माणसे नावडती असतात अर्थात ह्याला कारणेही आहेत . आपले मन पूर्वग्रहदुषित असते . त्या व्यक्तिची बाजू आपल्याला पूर्णपणे ज्ञात नसते . आपला इगो प्रॉब्लेम असतो . समोरची व्यक्ती खरच चांगली नसते किंवा तिचे गुण/अवगुण आपल्याला आवडत नाहीत . कधी मत्सर असतो . इत्यादी इत्यादी . जर का अशी व्यक्ती आवडती झाली तर एकच अर्थ निघू शकतो कि त्या व्यक्तीने स्वतःचे वागणे सुधारले असण्याची शक्यता आहे , आपणही अधिक परिपक्व विचार केला असेल . . . . ह्या सर्वचा शिवामुठीशी प्रत्यक्ष कसा काय संबंध ?

मुलेबाळे होणे हा शारीरीक पातळीवरचा प्रश्न आहे . पुढे ती मुले चांगली निघणे हा तुमच्या पूर्वसुकृताचा परिणाम आहे . त्यामुळे केवळ मनोभावे पुजाअर्चा केल्यामुळे मुले होऊ लागली तर डॉक्टरांनी करायचे काय हो ? संपत्ति मिळविण्यासाठी अपार श्रमांची गरज आहे . श्रमांचे मोल जाणणे जरूरीचे आहे . नशीबाचा भाग आहेच . पण प्रामाणिक श्रम करायची तयारी असेल तर दोन वेळेच्या अन्नाला नक्कीच मरण नाही .

माझा विरोध शिवामुठ वहाण्याला नाही. पण जरा वेगळा विचार करायला काय हरकत आहे. शंकराला वाहीलेले धान्य फुकटच जाणार आहे. दुस-या दिवशी कुसून वास येतो तो भाग वेगळा. जर का हेच धान्य गरीब गरजू माणसाला दिले तर ? किंवा त्या धान्याच्या बदली एखाद्या गरीब मुलाला शाळेची पुस्तके , वह्या घेऊन दिल्या तर ? अगदीच काही नाही तर गुरूजीला दक्षिणा दिली तर ? धान्याची नासाडी वाचेल , आजूबाजूच्या लोकांना धान्य कुसून वास येतो व प्रदुषण होते ते वाचेल व वेगळया रूपात दानधर्म केल्यामुळे पूण्यपण लागेल.

प्रश्न असा आहे की हा वेगळा विचार करणार कोण ? लग्न होऊन सासरी आलेली सुन की तीची सासू ? सासरा व नव-यानेसुद्धा विचार करायला हरकत नाही.

परंतु हे होत नाही व खूप शिकलेली सून सकाळी ६ वाजता नटूनथटून सासूबरोबर शिवामूठ वहायला येते. ५ मिनीटांचा तर प्रश्न. कशाला सासूला विरोध करा. सासू पण खुष. आपली एवढी शिकलेली सून आपल्या शब्दाबाहेर नाही म्हणून तीचे नाक आणखीनच हवेत जाते. सर्वांचेच समाधान. नवरापण बायकोवर खुष.

असा सगळा खुशीचाच मामला मग मीच कशाला उगीचच बोंबला ?